# युवा-साधक

## श्रीगुरुमाईंसोबतचे प्रसंग

### आनंदमय जन्मदिवसाच्या निमित्ताने

श्रीगुरुमाईंसोबतचा प्रसंग : १

शकुंतला सीगल

वर्ष २०११मधील जून महिना होता, गुरुमाईंच्या जन्मदिवसाचा महिना. २४ जूनच्या सप्ताहाच्या अंती मला व माझ्या कुटुंबियांना श्री मुक्तानंद आश्रमात येण्याचे आमंत्रण मिळाले होते, आणि म्हणून आम्ही सर्वजण अतिशय खूश होतो, विशेषतः माझ्या मुली, प्रेमा व सरीखा. २४ जूनचा दिवस आला — तो दिवस ज्याची सर्वजण अतिशय आतुरतेने वाट पाहत होते. माझी लहान मुलगी प्रेमा, जी त्या वेळी तीन वर्षांची होती, त्या दिवशी सकाळी जेव्हा जागी झाली, तेव्हा अतिशय खूश होती. झोपेतून उठताक्षणीच अतिशय ठामपणे ती म्हणाली, "गुरुमाई आज त्यांच्या जन्मदिवसाच्या समारंभात येणार आहेत, आणि त्या त्यांची गोल टोपी घालतील!

मी तुम्हाला हे सांगू इच्छिते की, प्रेमा जेव्हा अगदी लहान होती, तेव्हा ती आश्रमात गेली होती, त्यानंतर कधीही गेली नव्हती. जितके आम्ही जाणत होतो, तिला हे लक्षातही राहिले नसेल की, याआधी व्यक्तिगत रूपात ती गुरुमाईंच्या सान्निध्यात कधी राहिली होती. त्यामुळे तिला हे कसे कळले असते की, गुरुमाई येणार आहेत किंवा नाही, किंवा त्यांचा पेहराव कसा असेल?

त्यानंतर, त्याच दिवशी सकाळी श्रीनिलय हॉलमध्ये एस. वाय. डी. ए. फाउंडेशनच्या स्टाफसाठी आणि व्हिजिटिंग सेवाकर्त्यांसाठी एक वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते, जे जन्मदिवस महोत्सवाचाच एक भाग होते. माझे पती, एसा, त्या कार्यक्रमाचे सूत्रधार म्हणून सेवा अर्पण करत होते. वर्कशॉपच्या दरम्यान मी प्रेमा, तिची बहीण सरीखा आणि इतर काही मुलांसमवेत होते, जे बालकक्षात खेळत होते.

वर्कशॉपच्या समारोपाच्या वेळी गुरुमाई श्रीनिलय हॉलमध्ये आल्या आणि त्यांनी आपले आसन ग्रहण केले. आणि खरोखरच, त्यांनी जी टोपी घातलेली होती तिची किनार गोल होती [जिला एखादे तीन

वर्षांचे बालक 'गोल टोपी'च म्हणेल]! माझ्या पतींनी गुरुमाईंना जन्मदिवसाच्या अनेक शुभेच्छा दिल्या; त्यानंतर आनंदातिरेकामुळे त्यांना राहवले नाही आणि त्यांनी गुरुमाईंना सांगितले, "गुरुमाई मी तुम्हाला सांगू इच्छितो की, माझी तीन वर्षांची मुलगी, प्रेमा आज जेव्हा सकाळी झोपेतून जागी झाली, तेव्हा पहिली जी गोष्ट तिने मला सांगितली, ती होती, 'गुरुमाई आज त्यांच्या जन्मदिवस समारंभात येणार आहेत आणि त्या त्यांची गोल टोपी घालतील!'"

गुरुमाई आनंदाने हसल्या. मग त्या म्हणाल्या की, त्यांना वाटत होते की त्यांच्या या टोपी घालण्यामागे नक्कीच काही कारण असावे! त्या म्हणाल्या की, खरेतर त्या दिवशी टोपी घालण्याचा त्यांचा विचार नव्हता. पण त्या जेव्हा वर्कशॉपला येण्यासाठी निघाल्या, तेव्हा त्यांची नजर त्या टोपीवर पडली आणि त्यांनी ती उचलली. त्या म्हणाल्या, "होय, मी ती तिच्यासाठीच घातली!"

त्याच वेळी मी माझ्या मुलींसह श्रीनिलय हॉलमध्ये मागच्या बाजूने प्रवेश करत होते. वर्कशॉपचा समारोप झाल्यावर, 'सद्‌गुरुनाथ महाराज की जय!'चा उल्हासपूर्ण उद्‌घोष झाला आणि त्यानंतर गुरुमाई त्यांच्या आसनावरून उठल्या व हॉलच्या मागच्या बाजूकडे, अगदी आमच्याच दिशेने येऊ लागल्या. मोठ्या सुहास्यासह त्या थेट आमच्याजवळ आल्या आणि माझ्या तीन वर्षांच्या मुलीकडे पाहत त्यांनी मला विचारले, "प्रेमा?" मी उत्तर दिले, "होय, गुरुमाई!"

मग गुरुमाई आपल्या गुढग्यांवर बसल्या जेणेकरून त्या प्रेमाशी बोलू शकतील. त्या तिला म्हणाल्या, "होय, प्रेमा! मी ही टोपी तुझ्यासाठीच घातली आहे! खरे आहे . . . मी ही टोपी तुझ्याचसाठी घातली!" हे ऐकून प्रेमाने स्वीकृतीदर्शक मान डोलावली.

अशा या अनमोल सुसंवादाला एवढ्या जवळून पाहून मी अत्यानंदित झाले. माझ्या श्रीगुरू माझ्या मुलीवर इतक्या प्रेमाचा वर्षाव करत आहेत, हे पाहून माझे मन हेलावून गेले. मला असे जाणवले की, काहीतरी खूप महत्त्वाचे घडते आहे. गुरुमाई थेट प्रेमाशी बोलत होत्या आणि मला असे जाणवत होते की, त्या दोघीजणी एकमेकींना एका अशा स्तरावरून समजून घेत होत्या की जो माझ्याकरता अत्यंत गूढ होता. मग गुरुमाईंनी प्रेमाला अतिशय प्रेमाने घट्ट मिठी मारली व तिचे चुंबन घेतले आणि मग त्या तिथून निघून गेल्या.

हा प्रसंग मला नेहमी आठवतो ज्यामध्ये एक गूढ सुसंगतपणा आहे. हा सुसंगतपणा प्रेमासाठी, जी त्या वेळी आश्रमात सर्वात लहान होती, पूर्णतः स्वाभाविक होता. गुरुमाई प्रेमाशी किती आदराने बोलत

होत्या; त्या तिच्याशी अशा प्रकारे संभाषण करत होत्या की त्याचे आकलन केवळ त्या दोघींनाच होते आहे असे वाटत होते — आत्म्याचा आत्म्याशी संवाद.

इतक्या वर्षांपासून हा अनुभव माझ्या स्मरणात राहिला आहे आणि अत्यंत सशक्तपणे तो मला आठवण करून देतो की श्रीगुरू सर्वांच्या आत्म्याशी एकरूप आहेत आणि त्या सतत त्यांच्या संपर्कात राहतात, त्यांच्याशी संवाद साधतात जे त्यांच्यावर प्रेम करतात; आणि लहान मुलांप्रमाणेच जर आपल्या हृदयात खुलेपणा असला व आपले मन निर्मळ असले, तर आपणदेखील त्या आंतरिक वार्तालापाची अनुभूती घेवू शकतो.

प्रेमा आता दहा वर्षांची आहे; आजही ती त्या क्षणाची आठवण करते, जो तिच्याकरता खास तर आहेच पण त्याचबरोबर तो सहज-स्वाभाविकदेखील आहे. नुकतेच मी प्रेमाला विचारले की, तो क्षण कसा तिच्या आठवणीत राहिला आहे, तेव्हा तिने उत्तर दिले, "त्या वेळी मी काही हुशार बनत नव्हते. मला फक्त माहीत होते." आणि मग ती हसून म्हणाली, "गुरुमाई सर्वकाही जाणतात."

श्रीगुरुमाईंसोबतचा प्रसंग : २

वाणी अग्रवाल

वर्ष १९८०च्या सुरुवातीच्या काळात, मी गुरुदेव सिद्धपीठात एक युवा गुरुकुल विद्यार्थिनी म्हणून राहत होते. आश्रमाचा प्रत्येक भाग मला अतिशय प्रिय होता — भगवान नित्यानंदांचे मंदिर, समाधी मंदिर, गुरुचौक.

तिथे फुलांनी आणि झाडांनी बहरलेले सुंदर बगीचेदेखील मला खूप आवडत असत. तुम्हाला माहितच असेल की, आश्रमातील बागांमध्ये कितीतरी प्रकारची फळझाडे आहेत — जसे की, आंबा, जांभूळ, फणस आणि पेरू.

अन्नपूर्णा हॉलजवळ एक पेरूचे झाड होते, जे हिवाळ्यामध्ये कायमच अतिशय चवदार पेरूंनी भरलेले राहत असे.

आम्हा मुलांना पेरू खूपऽऽऽच आवडत! दररोज अन्नपूर्णात जाताना जेव्हा आम्ही या झाडाजवळून जात असू तेव्हा फांद्यांवर लटकणाऱ्या पिवळ्याधमक पेरूंकडे मोठ्या आशाळभूत नजरेने पाहात असू.

आणि दररोज आम्ही अर्धवट खाल्लेले पेरू तिथे जमिनीवर पडलेले पाहात असू. खारी आणि पोपट पेरूंची मेजवानी झोडत आणि उरलेसुरलेले तिथेच सोडून देत असत.

आम्हालाही पेरू खाण्याची खूप इच्छा होत असे. आम्ही काही मुलांनी एकत्र येऊन याविषयी चर्चा केली. आणि आश्रमातील झाडांवरची फळे तोडू नयेत हे जरी आम्हाला अगदी चांगलेच माहित असले, तरीदेखील आमच्या अपार शहाणपणाच्या आधारे आम्ही निर्णय घेतला की, जर पशूपक्षी आश्रमातील फळे खाऊ शकतात, तर आम्ही मुलेदेखील खाऊ शकतो.

मग आम्ही एक योजना बनवली.

एके दिवशी दुपारी, जेवणानंतर जेव्हा सर्व लोक एकतर आपापल्या खोल्यांमध्ये किंवा सेवेला परत गेले होते, तेव्हा आम्हा चोरांची छोटीशी टोळी त्या पेरूच्या झाडाजवळ जमा झाली. आजूबाजूला कोणीही नाही याची खातरजमा आम्ही केली. आमच्यातील एका मुलीला झाडावर चढता येत होते, तेव्हा ती म्हणाली की, ती झाडावर चढेल. झाड काही फार उंच नव्हते, म्हणून आम्ही सर्वांनी तयारी दर्शवली.

आम्ही सर्वजण झाडाच्या आजूबाजूला एकत्र झालो. आमच्या मैत्रिणीने झाडावर चढून पिकलेले पेरू तोडून खाली फेकायला सुरुवात केली आणि आम्ही ते एकत्र गोळा करू लागलो.

आम्ही पाच-सहाच पेरू गोळा केले होते आणि अचानक आम्हाला एक आवाज ऐकू आला . . . एक गंभीर, घुमणारा आवाज . . . असा आवाज जो आम्ही सर्वजण अगदी बरोबर ओळखत होतो . . . असे म्हणताना, “यहाँ क्या चल रहा है?” म्हणजेच, “काय चालले आहे इथे?”

एका सेकंदासाठी तर आमचे हातपायच गारठले. आणि मग गुरुमाईंकडे वळूनदेखील न पाहता, झाडाच्या फांदीवर बसलेल्या आमच्या मैत्रिणीला तिथेच एकटीला सोडून देत आम्ही सर्वांनी तिथून पळ काढला. झाडावर असलेल्या आमच्या मैत्रिणीने ज्या क्षणी गुरुमाईंना पाहिले, तिने खाली उडी मारली आणि ती गुरुमाईंच्या पायांपाशीच पडली. मग धांदलीने ती उठली आणि मागे वळून न पाहताच तिथून पळून गेली.

ती संपूर्ण दुपार आम्ही सर्व मुली एकमेकींना टाळायचा प्रयत्न करत होतो; आमच्यातील प्रत्येकजण विचार करत होती, “अरे देवा, हे आम्ही काय केले? आम्ही ना केवळ आश्रमातील फळे तोडली, तर आम्ही गुरुमाईंपासूनही पळ काढला! आता काय होणार?”

परंतु, त्याच दिवशी संध्याकाळी माझ्या आश्चर्याला आणि आनंदाला तेव्हा काही पारावार उरला नाही, जेव्हा मला गुरुमाईंकडून प्रसाद मिळाला — पेरूंनी भरलेली एक टोपली!

नंतर मला कळले की, ज्या-ज्या मुली त्या खट्याळ कृत्यात सामील होत्या, त्या प्रत्येकीला असाच प्रसाद मिळाला होता.

आणि या प्रसादाबरोबरच आमच्यातील प्रत्येकीला गुरुमाईंकडून एक संदेशही मिळाला होता.

गुरुमाईंचा आमच्यासाठी संदेश होता, "यदि तुम्हें कुछ चाहिए तो माँगकर देखो। हो सकता है वह तुम्हें मिल जाए या हो सकता है न भी मिले। पर महत्त्वपूर्ण बात यह है कि इस तरह तुम वह करोगे जो सही है।" म्हणजेच, तुम्हाला जर काही हवे असेल तर मागून पाहा. असे होऊ शकते की, ते तुम्हाला मिळेल किंवा असेही होऊ शकते की, मिळणार नाही. पण महत्त्वाची गोष्ट ही आहे की, अशा प्रकारे तुम्ही ते कराल जे योग्य आहे."

गुरुमाईंचा प्रसाद आणि त्यांचा हा हेतू की, आम्ही केलेल्या चूकीतून शिकावे, या सर्वातून मला अत्यंत प्रेमाची अनुभूती झाली.

गुरुमाईंची ही शिकवण माझी अत्यंत जवळची सांगाती बनून राहिली आहे; त्या शिकवणीने मला माझ्या जीवनातील योग्य निर्णय घेण्यासाठी पुन्हापुन्हा मार्गदर्शन केले आहे.

आपल्याला हृदयापासून धन्यवाद गुरुमाई.

गुरुमाईंसोबतचा प्रसंग : ३

लीलावती स्टुअर्ट

सप्टेंबर १९९९मध्ये, गुरुमाई 'टीचिंग व्हीजीटस्'च्या यात्रेदरम्यान गुरुदेव सिद्धपीठात होत्या. मी सेवा अर्पण करण्यासाठी तिथे गेले होते. माझ्याबरोबर माझा सहा महिन्यांचा मुलगा जस्टीनही होता. मी प्रथमच आई झाले होते आणि एक आई म्हणून या सुंदर आणि चंचल बाळाच्या गरजा कशा भागवायच्या हे मी शिकत होते.

आमच्या या आश्रमातील वास्तव्यादरम्यान, गुरुमाई नेहमी गुरुचौकात बसून दर्शन देत असत. दर्शनाच्या वेळी मीसुद्धा माझ्या मुलाला घेऊन तिथे बसत असे. आणि ज्यावेळी तो चुळबुळ करू लागे किंवा कुरकुर करून रडू लागे त्यावेळी मी टाळ्या वाजवत असे, गात असे आणि त्याला हसवण्याचा प्रयत्न करत असे. त्याला खूश ठेवण्यासाठी मी खूप प्रयत्न करायचे.

एके दिवशी, जस्टीन झोपलेला असताना गुरुमाई आमच्या निवासस्थानी  आम्हाला भेटण्यासाठी आल्या. गुरुमाई मला म्हणाल्या की, जेव्हा माझा मुलगा रडतो, तेव्हा त्या प्रत्येक प्रसंगी त्याला शांत करण्यासाठी मी कशी त्याची करमणूक करायला सुरुवात करते, हे त्यांनी पाहिले आहे. त्यानंतर गुरुमाईंनी अतिशय सुंदर रीतीने मला एका आईच्या भूमिकेविषयी समजावून सांगितले : प्रेम करणे, बाळाचे पालनपोषण करणे, बाळाच्या सुरक्षिततेची काळजी घेणे, बाळ आरामदायक परिस्थितीत आहे याची खातरजमा करणे, त्याच्या क्षेमकुशलावर लक्ष ठेवणे. गुरुमाईंनी मला सांगितले की, जर मी सदासर्वकाळ त्याला आनंदी ठेवण्यासाठी त्याच्या ‘करमणूकीचे साधन’ बनले, तर त्याला भविष्यात त्याचे मोल चुकवावे लागेल. स्वतःची मनःस्थिती सुखदायक नसतानादेखील कोणाचीही मदत न घेता एकट्याने कसे राहावे, याच्या शिक्षणापासून ही गोष्ट त्याला दूर ठेवेल. एकटेपणाच्या किंवा दुःखाच्या भावनांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी तो तेव्हा ‘करमणूकीचे साधन’ म्हणून, कदाचित चूकीच्या लोकांना त्याच्या जीवनात स्थान देऊ शकतो. आता तो एक लहान मूल असताना, जर मी त्याला त्याच्या भावनांसमवेत राहू न देता त्याचे लक्ष दूसरीकडे वळवले, तर कदाचित जेव्हा तो मोठा होईल तेव्हा स्वतःला खऱ्या भावनांपासून दूर नेऊ पाहील. आणि प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने पाहून विचार करण्याची त्याची क्षमता तो गमावेल. असेही होऊ शकते की, स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याऐवजी तो इतरांवर त्यासाठी निर्भर राहू शकेल.

मी अगदी मनापासून गुरुमाईंचे आभार मानले आणि ताबडतोब त्यांचे मार्गदर्शन कृतीत आणण्यास सुरुवात केली. मुलाचे रडणे बंद करण्याऐवजी तसेच मला हव्या असलेल्या मनःस्थितीत त्याला आणण्याऐवजी, मी त्याचे म्हणणे ऐकण्याकडे आणि समजून घेण्याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली, की वास्तवात तो काय सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. असे केल्याने माझ्या अंतरात एक मोकळेपणा येऊ लागला आणि कोणत्याही क्षणी असलेल्या त्याच्या गरजा जाणू लागले की, त्या क्षणी त्याला काय हवे आहे, जसे त्याला भूक लागली आहे का, थंडी वाजते आहे का, तो थकला आहे का, कंटाळला आहे का की, त्याचे कपडे बदलायचे आहेत. गुरुमाईंच्या जे दृष्टीस पडले होते, ते आता मला समजू लागले —

माझ्या मुलाला फक्त त्याची करमणूक करवून घ्यायची नव्हती. त्याला मी त्याची आई व्हायला हवे होते.

माझे पालकत्व जसजसे अधिकाधिक सहज आणि परिणामकारक होऊ लागले तसतसा माझा मुलगा अधिकाधिक तणावमुक्त आणि स्वावलंबी होऊ लागला. माझे पती मला म्हणत, “तू एक खूपच चांगली आई आहेस — हे सर्व इतके व्यवस्थित करणे कसे जमते तुला?” मी उत्तर देत असे, “एक आई कसे व्हावे याविषयी गुरुमाई जे सांगतात, ते मी ऐकते.”

मला गुरुमाईंचे हे मार्गदर्शन प्राप्त होऊन आता जवळजवळ अठरा वर्षे झाली आहेत आणि मी ही गोष्ट प्रमाणित करू शकते : माझ्या मुलाला त्याची स्वतःची संगत आवडते. तो स्वयंप्रेरणेने स्वतःची अशी एक दिशा त्याच्यासाठी निश्चित करतो आणि त्या दिशेने प्रवासाला सुरुवात करतो, आत्मविश्वासपूर्वक! आपली संगत पारखून घेण्याच्या बाबतीत तो निश्चितच विवेकशील आहे. माझ्या मुलाचे जीवन ज्या पद्धतीने विकसित होते आहे त्यात एका आईच्या हार्दिक इच्छेची पूर्ती आहे : हे जाणणे की, तिची मुले स्वतःच्या पायांवर उभी राहू शकतात आणि आपण कोण आहोत याविषयीची दृढ समज त्यांच्यात आहे.

गुरुमाईंचे प्रेम आणि मार्गदर्शन माझ्या पालकत्वाचे आधार आहेत. आणि माझ्या हृदयचक्षुंनी मी हे पाहू शकते आहे की, माझी मुले हे मार्गदर्शन त्यांच्या मुलांना वारसा म्हणून देतील. आणि ही परंपरा अशीच पुढे चालू राहील.

धन्यवाद, गुरुमाई.

© २०१७ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.